# दिनांक २३ जुलै २०२३ रोजी झालेल्या
# विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था मर्या. पुणे करिता विशेष सर्वसाधारण सभा दि. २३.०७.२०२३ रोजी संस्थेच्या समाज मंदिर येथे सकाळी १०:०० वाजता आयोजित करण्यात आली. संस्थेचा पुनर्विकास करणेकामी दि. २५.०६.२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये एका विकसकाची निवड करण्यात आली. सदर विकसकाकडून सद्य नियमांचे आधारे संस्थेस देय असा FSI चा प्रस्ताव संस्थेच्या सर्व उपस्थित ८३ सभासदांनी स्वीकारला होता. सदर देय FSI हा संस्थेच्या सर्व सभासदांकरिता वाढीव FSI (एकूण देय FSI संस्थेच्या सभासदांकडे असलेला FSI) स्वरुपात असून असा 'वाढीव देय FSI चे' संस्थेच्या १०२ सभासदांना कश्या पद्धतीने वाटप करण्यात यावे याकरिता संस्थेच्या पंचसमितीने सदर विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन केले होते. सदर सभेस सर्व सभासदांनी उपस्थित राहावे असे आवाहन पंचसमितीने केले होते, मात्र सकाळी १०:०० वाजता संस्थेचे एकूण १०२ पैकी केवळ ५५ सभासदच उपस्थित होते. सर्व उपस्थित सभासदांच्या संमतीने संस्थेच्या अध्यक्षांनी १०:३० पर्यंत उर्वरित सभासदांची वाट पाहणे ठरविले. सकाळी १०:३० वाजेपर्यंत इतर सभासद न आलेने मा. अध्यक्षांनी सभेची सुरवात करण्याची घोषणा केली. तेव्हा संस्थेचे एक सभासद श्री. रोहन मोरे यांनी ६५ सभासद हजर नसल्याने सभा सुरू करू नये असा आक्षेप नोंदवला, तेव्हा अध्यक्षांनी सर्वसाधारण सभेबाबत असलेल्या कायदेशीर तरतुदींचा उद्देश लक्षात घेऊन कार्यक्रम पत्रिके नुसार त्या विषयावरील उपस्थित सभासदांचे मत समजून घेऊया, असे सांगून सभा सुरू केली. मतदान प्रक्रियेची सभासदांना माहिती देऊन या प्रक्रियेसाठी श्री. शशांक गोखले हे सदस्य मतदान विषयक काम पाहतील असे सांगितले. त्यानुसार मतदान प्रक्रिया श्री. गोखले यांनी सुरू केली, त्या कामे श्री. गणेश शिरोडे यांनी त्यांना सहाय्य केले. मतदान प्रक्रिया व मतमोजणी रीतसर पार पडल्यावर, श्री. शशांक गोखले यांनी त्याची माहिती सभेला दिली त्यानुसार वाढीव एफएसआय वाप टक्केवारीनुसार करावे यास 51 मते पडली, वाढीव एफएसआयचे वाटप सर्वां सारखे करावे यास तीन मते पडली, तर एक मत बाद झाले एकूण मतदान 55 झाले होते.

सदर विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन हे 'वाढीव FSI चे वाटप संस्थेच्या सभासदांमध्ये करणे बाबतचा निर्णय घेणे' करिता होता. मात्र, बऱ्याच सभासदांची अनुपस्थिती असले कारणे ने सदर मतदान हे केवळ उपस्थित सभासदांचे विचार व कल समजून घेणेकरिता झाले असल्याचे मा. अध्यक्ष जाहीर केले. त्यानंतर सभा समाप्त झाल्याचे जाहीर केले.

**विनायक पटवर्धन सचिव**